**"राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता" या अभियाना अंतर्गत राज्यातील विमुक्त जाती व भटक्या जमातींच्या नागरिकांना शासनाच्या विविध योजनांचा व प्रमाणपत्रांचा लाभ मिळण्याकरीता "भटके-विमुक्त हक्क व प्रमाणपत्र अभियान" (विशेष मोहीम: दिनांक २७, २८ व २९ सप्टेंबर, २०२६) आयोजित करणेबाबत...**

**महाराष्ट्र शासन**

**महसूल विभाग**

**शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-२०२६/प्र.क्र.१३७/आस्था-०१ (ई-१८२९११९३)**

मंत्रालय मुख्य इमारत, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-३२
दिनांक: १५ सप्टेंबर, २०२६

**वाचा :-**

१. शासन निर्णय, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, क्रमांक-संकीर्ण-२०२५/ प्र.क्र.१४८/ मावक, दिनांक २८ ऑगस्ट, २०२५.
२. शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-२०२५/प्र.क्र.१६९/मावक, दिनांक १९ सप्टेंबर, २०२५.
३. शासन परिपत्रक क्रमांकः बैठक-२०२६/प्र.क्र.३५/मावक, दिनांक ०७/०८/२०२६.
४. दिनांक १२/०८/२०२६ रोजी मा. मंत्री (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीतील निर्देश.

**शासन परिपत्रक:-**

राज्य शासनामार्फत विमुक्त जाती व भटक्या जमातींच्या कल्याणासाठी विविध योजना लागू करण्यात आल्या आहेत. महाराष्ट्र राज्यात विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गाची संख्या लक्षणीय असून, त्यांच्या भटक्या जीवनशैलीमुळे शासनाच्या विविध योजनांचा लाभ त्यांच्यापर्यंत प्रभावीपणे पोहचविणे आवश्यक आहे.

विमुक्त जाती व भटक्या जमातींच्या नागरिकांना त्यांचे मूलभूत अधिकार व शासनाच्या विविध योजनांचे लाभ मिळण्यासाठी आवश्यक असलेली ओळखपत्रे, शासकीय प्रमाणपत्रे व विविध योजनांचा लाभ मिळण्याबाबतच्या कार्यपद्धतीत सुलभता आणण्याच्या प्रस्तावास मा. मंत्रिमंडळाच्या दि. २६/०८/२०२५ रोजीच्या बैठकीत मान्यता प्राप्त झाली आहे.

सदर कार्यपद्धती अंतर्गत विमुक्त जाती व भटक्या जमातींच्या लाभार्थ्यांना ओळखपत्रे, प्रमाणपत्र वितरण तसेच विविध शासकीय योजनांचा लाभ देण्यासाठी महसूल तसेच योजनेशी संबंधित इतर

शासकीय विभाग आणि इतर मागास बहुजन कल्याण विभाग यांनी संयुक्तपणे मंडळ/तालुका स्तरावर शिबिरांचे आयोजन करावे.

"राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता" या अभियाना अंतर्गत सप्टेंबर २०२६ मध्ये दिनांक २७, २८ आणि २९ सप्टेंबर, २०२६ रोजी विशेष मोहीम म्हणून अभियान आयोजित करण्याचे शासनस्तरावर निश्चित करण्यात आले आहे. तसेच सदर अभियान संबंधित जिल्ह्याचे मा. पालकमंत्री, स्थानिक खासदार, आमदार व इतर लोकप्रतिनिधी यांच्या प्रमुख उपस्थितीत व मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यासाठी, खालीलप्रमाणे कार्यपद्धती विहित करण्यात येत आहेत.

१. राज्यातील सर्व संबंधित जिल्ह्यांमध्ये व तालुक्यांमध्ये विमुक्त जाती व भटक्या जमातींच्या प्रवर्गाच्या नागरिकांसाठी दिनांक २७, २८ आणि २९ सप्टेंबर, २०२६ रोजी वस्तीनिहाय विशेष "भटके-विमुक्त हक्क व प्रमाणपत्र अभियान" अनिवार्यपणे आयोजित करण्यात यावेत. त्यानंतरचे नियमित अभियान **प्रत्येक तिमाहीच्या पहिल्या मंगळवारी** घेण्यात यावेत.
२. सदर अभियानाच्या पूर्व तयारीचा प्रशासकीय आढावा मा.पालकमंत्री व पालक सचिव यांनी घ्यावा. पालक सचिव यांनी दिनांक २७ ते २९ सप्टेंबर दरम्यान होणाऱ्या अभियानाला देखील भेट द्यावी.
३. विभागीय आयुक्त यांनी सदर अभियानाचा आढावा घ्यावा व विभागीय आयुक्त कार्यालयातील उपायुक्त दर्जाच्या अधिकाऱ्यांनी अभियान स्थळी प्रत्यक्ष भेट दयावी.
४. या विशेष अभियानाचे उद्घाटन संबंधित जिल्ह्याचे मा. पालकमंत्री महोदय यांच्या हस्ते करण्यात यावे.(सोबत जोडलेल्या यादीनुसार) तसेच या अभियानाकरिता स्थानिक खासदार, आमदार आणि इतर स्थानिक लोकप्रतिनिधी यांना आग्रहाचे निमंत्रण देऊन त्यांची उपस्थिती सुनिश्चित करावी.
५. संदर्भ क्र. २ मधील शासन निर्णयान्वये नियुक्त जिल्हास्तरीय समितीमधील अशासकीय सदस्य, भटके विमुक्त समुदायासाठी काम करणाऱ्या अशासकीय सेवाभावी संस्था यांच्या पदाधिकाऱ्यांनाही निमंत्रित करण्यात यावे.
६. सदर अभियानामध्ये संबंधित उपविभागीय अधिकारी, गटविकास अधिकारी, तहसिलदार, मुख्याधिकारी, आरोग्य विभागाचे जिल्हा स्तरावरील अधिकारी आणि जिल्हा व तालुका स्तरावरील सर्व संबंधित विभागांचे सक्षम अधिकारी प्रत्यक्ष उपस्थित राहतील. महानगरपालिका व नगरपालिका क्षेत्रात वार्ड अधिकारी, आरोग्य अधिकारी व आवश्यक असणारे अधिकारी व कर्मचारी उपस्थित राहतील.
७. अभियानामध्ये आधार कार्ड, निवडणूक ओळखपत्र, शिधापत्रिका, जात प्रमाणपत्र, आयुष्मान भारत कार्ड, उत्पन्नाचा दाखला, नॉन क्रिमीलेयर, रहिवास/अधिवास दाखला, विवाह नोंदणी, दिव्यांग इ. प्रमाणपत्रे, तसेच श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजना, संजय गांधी निराधार अनुदान योजना, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना, प्रधानमंत्री आवास योजना, पीएम किसान योजना इत्यादी योजनांचे प्रत्यक्ष लाभ हे उपस्थित मा.पालकमंत्री, पालक सचिव व इतर मान्यवरांच्या हस्ते लाभार्थ्यांना सुपूर्द करण्यात यावेत.

८. अभियाना दरम्यान लाभार्थ्यांना तात्काळ प्रमाणपत्रांचे वाटप करणे तसेच विविध शासकीय योजनांचा लाभ लाभार्थ्यांना मिळण्याकरिता प्रशासकीय यंत्रणेने अभियाना अगोदरच वस्ती निहाय लाभार्थ्यांची यादी तयार करून आवश्यक असलेल्या सर्व कागदपत्रांची पूर्तता करून घ्यावी.

९. अभियानाची माहिती सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहचण्यासाठी जिल्हाधिकारी यांनी पत्रकार परिषद घ्यावी. जिल्हा माहिती अधिकारी यांनी प्रिन्ट मीडिया, सोशल मीडिया यांच्या माध्यमातून अभियानाची व्यापक प्रचार व प्रसिध्दी करावी.

१०. अभियानाचा सविस्तर अहवाल ( परिशिष्ट - अ ) नुसार तहसिलदार यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे सादर करावा व जिल्हाधिकारी यांनी तालुकानिहाय प्राप्त अहवाल संकलित करून महिन्याभराच्या कालावधीमध्ये संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय यांच्याकडे सादर करावा.

११. सदर अभियानाच्या राज्यस्तरीय समन्वयाची जबाबदारी अपर मुख्य सचिव (महसूल विभाग) आणि सचिव (इतर मागास बहुजन कल्याण विभाग) यांची राहील.

१२. सदर अभियाना दरम्यान पालक सचिवांमार्फत घेतल्या जाणाऱ्या भेटीबाबतचा समन्वय मा. मुख्य सचिव करतील.

१३. या अभियानात उत्कृष्ट काम करणाऱ्या जिल्हा, उपविभाग, तालुका, गाव तसेच महानगरपालिका, नगरपरिषद, नगरपंचायत यांचा शासनामार्फत गौरव करण्यात येईल.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०२६०९१५१६०१२३८१४८ असा आहे. सदर शासन परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

MAHESH ASHOKRAO VARUDKAR

Digitally signed by MAHESH ASHOKRAO VARUDKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FORESTS DEPARTMENT,
2.5.4.20=D93C4961D98086877A4048296211D7AF97ECFD40D7967C43D20B360D83CE0FA6, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=7EBBBC3712E8D459EF90BF7AAE4EA46E9CAEBDD50CFECDE2EE7CE0454FA0416A, cn=MAHESH ASHOKRAO VARUDKAR
Date: 2026.09.15 16:02:41 +05'30'

**(महेश वरुडकर)**
**शासनाचे उप सचिव**

प्रति,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. उपमुख्यमंत्री (नगरविकास व गृहनिर्माण) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा. उपमुख्यमंत्री (रा.ऊ. शु., क्रीडा व अल्पसंख्यांक विकास) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६. मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
७. सर्व मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
८. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई
९. सर्व विभागीय आयुक्त

१०. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमी अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे
११. नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे
१२. सर्व अपर आयुक्त (महसूल/सामान्य), विभागीय आयुक्त कार्यालय
१३. सर्व जिल्हाधिकारी
१४.महालेखापाल, महाराष्ट्र राज्य, मुंबई/ नागपूर
१५. निवडनस्ती (आस्था-0१), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.

# पालकमंत्री यांची यादी

| अ.क्र. | जिल्हा | पालकमंत्री / सह-पालकमंत्री यांचे नाव | पालक सचिव |
|---|---|---|---|
| १ | गडचिरोली | मा.श्री. देवेंद्र फडणवीस (मा.मुख्यमंत्री)<br><br>मा.श्री.आशिष जयस्वाल, सहपालकमंत्री | श्री. राजेश अग्रवाल |
| २ | ठाणे | मा.श्री. एकनाथ शिंदे (मा. उप मुख्यमंत्री) | श्री. नवीन सोना |
| ३ | मुंबई शहर | मा.श्री. एकनाथ शिंदे (मा. उप मुख्यमंत्री) | श्रीमती मनिषा वर्मा |
| ४ | पुणे | मा.श्रीमती सुनेत्रा अजित पवार (मा.उप मुख्यमंत्री) | श्रीमती व्ही.राधा |
| ५ | बीड | मा.श्रीमती सुनेत्रा अजित पवार (मा.उप मुख्यमंत्री) | श्री. विजय वाघमारे |
| ६ | नागपूर | मा.श्री. चंद्रशेखर बावनकुळे | श्री.असीम कुमार गुप्ता |
| ७ | अमरावती | मा.श्री. चंद्रशेखर बावनकुळे | श्री. आय.ए.कुंदन |
| ८ | अहिल्यानगर | मा.श्री. राधाकृष्ण विखे-पाटील | श्री.प्रवीण दराडे |
| ९ | वाशिम | मा.श्री. हसन मुश्रीफ | श्री. किरण कुलकर्णी |
| १० | सांगली | मा.श्री. चंद्रकांत (दादा) पाटील | श्रीमती. विनीता वैद-सिंघल |
| ११ | नाशिक | मा.श्री. गिरीश महाजन | श्री.एकनाथ डवले |
| १२ | पालघर | मा.श्री. गणेश नाईक | श्री. विकास खारगे |
| १३ | जळगाव | मा.श्री. गुलाबराव पाटील | श्री. एन.रामास्वामी |
| १४ | यवतमाळ | मा.श्री. संजय राठोड | श्री.धिरज कुमार |
| १५ | मुंबई उपनगर | मा.ॲड. आशिष शेलार<br>मा.श्री. मंगलप्रभात लोढा (सह-पालकमंत्री) | श्री.संजय खंदारे |
| १६ | रत्नागिरी | मा.श्री. उदय सामंत | श्री.आप्पासो धुळाज |
| १७ | धुळे | मा.श्री. जयकुमार रावल | श्री.विकासचंद्र रस्तोगी |

| | | | |
|---|---|---|---|
| १८ | जालना | मा.श्रीमती पंकजा मुंडे | श्री.पराग जैन नैनुटिया |
| १९ | नांदेड | मा.श्री. अतुल सावे | श्रीमती राधिका रस्तोगी |
| २० | चंद्रपूर | मा.डॉ. अशोक उईके | श्री.वेणुगोपाल रेडडी |
| २१ | सातारा | मा.श्री. शंभूराज देसाई | श्री.ओमप्रकाश गुप्ता |
| २२ | रायगड | मा.श्री. भरत गोगावले | श्री.के.एच.गोविंदराज |
| २३ | लातूर | मा.श्री. शिवेंद्रसिंहराजे भोसले | श्रीमती मनीषा म्हैसकर |
| २४ | नंदुरबार | मा.श्री. देवेंद्र फडणवीस (मा.मुख्यमंत्री-अतिरिक्त कार्यभार) | श्री.पी. अनबलगन |
| २५ | सोलापूर | मा.श्री. जयकुमार गोरे | श्री.संजय सेठी |
| २६ | हिंगोली | मा.श्री. नरहरी झिरवाळ | श्रीमती रीचा बागला |
| २७ | भंडारा | मा.श्री. संजय सावकारे | श्रीमती आभा शुक्ला |
| २८ | छत्रपती संभाजीनगर | मा.श्री. संजय शिरसाट | श्री.हर्षदीप कांबळे |
| २९ | धाराशिव | मा.श्री. प्रताप सरनाईक | श्री.अंशू सिन्हा |
| ३० | बुलढाणा | मा.श्री. मकरंद जाधव (पाटील) | श्री.दिलीप पांढरपट्टे |
| ३१ | सिंधुदुर्ग | मा.श्री. नितेश राणे | श्री.विरेंद्र सिंह |
| ३२ | अकोला | मा.श्री. आकाश फुंडकर | श्री.परिमल सिंह |
| ३३ | गोंदिया | मा.श्री. इंद्रनील नाईक | श्री.रणजितसिंह देओल |
| ३४ | कोल्हापूर | मा.श्री. प्रकाश आबिटकर<br>मा.श्रीमती माधुरी मिसाळ (सह-पालकमंत्री) | श्रीमती जयश्री भोज |
| ३५ | वर्धा | मा.डॉ. पंकज भोयर | श्री.मिलींद म्हैसकर |
| ३६ | परभणी | मा.श्रीमती मेघना साकोरे-बोर्डीकर | श्री.चंद्रकांत पुलकुंडवार |

# परिशिष्ट — अ

| **अ. क्र** | **जिल्हा / तालुका नाव** | **अभियानाचा दिनांक** | **वस्तीचे / अभियानाचे ठिकाण** | **प्रमाणपत्र प्राप्त झालेल्या लाभार्थ्यांची संख्या** | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | आधार कार्ड | निवडणूक ओळखपत्र | शिधापत्रिका | जात प्रमाणपत्र | उत्पनांचा दाखला | नॉन क्रिमिलेअर | रहिवास / अधिवास दाखला | विवाह नोदंणी प्रमाणपत्र | दिव्यांग प्रमाणपत्र | आयुष्यमान भारत कार्ड | इतर प्रमाणपत्रे |
| | | | | | | | | | | | | | | |

| **शासकीय योजनांच्या लाभार्थ्यांची संख्या :** | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजना | संजय गांधी निराधार अनुदान योजना | मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना | प्रधानमंत्री आवास योजना | पीएम किसान योजना | इतर योजना |
| | | | | | |